जाक्र.पंसचि/ग्रापं/तक्रार/ wore /२०१९
पंचायत समिती कार्यालय, चिपळूण
दिनांक – १३/०९/२०१९

प्रति,

मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रापं)
जिल्हा परिषद रत्नागिरी

विषय:- २४ /७ तक्रारी बाबत चौकशी अहवाल सादर करणे
संदर्भ:- १. जा.क्र. रजिप/साप्रवि/ग्रापं/व्हिपीसी-१०/४३३८/१९ दि. ०६.०७.२०१९
२. जा.क्र. रजिप/साप्रवि/ग्रापं/व्हिपीसी-१०/५००६/१९ दि. ०९.०९.२०१९

महोदय,

उपरोक्त विषयान्वये श्रीम. अश्विनी जगन्नाथ सुर्वे यांनी वैयक्तिक नळ कनेक्शन मिळालेले नसल्याची तक्रार सादर केलेली होती संदर्भिय पत्रानुसार विस्तार अधिकारी(ग्रामपंचायत) मार्फत तक्रार प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे सदर चौकशीचा अहवाल खालील प्रमाणे-

विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांचे मार्फत-

श्रीम. अश्विनी जगन्नाथ सुर्वे तक्रारदार, तसेच श्रीम. गायकवाड, मा. सरपंच नवीन कोळकेवाडी, श्री. सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य नवीन कोळकेवाडी यांच्या समक्ष प्रत्यक्ष ठिकाणी भेट देण्यात आली व वस्तुस्थितीची पहाणी करण्यात आली, तक्रारदार ज्या परसरामध्ये राहतात त्या परिसरातील ग्रामस्थांना होणारा पाणी पुरवठा हा कमी दाबाने होतो त्यामुळे सदयस्थितीतील नळ पाणी पुरवठा योजनेवरुन होणारा पाणी पुरवठा अपुरा आहे, पाण्याच्या टाकीच्या उंचीपेक्षा सदर पसिरातील काही ग्रामस्थांची घरे ही उंच ठिकाणी असल्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत व व्यवस्थीत होऊ शकत नाही.

तक्रारदार श्रीम. अश्विनी जगन्नाथ सुर्वे यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देण्यात आली असता सार्वजनीक नळपाणी पुवठा योजनेची पाईप लाईन मार्फत तक्रारदार यांना नळ कनेक्शन दिले तरी तक्रारदाराचे घर उंचीवर असल्यामुळे पाणी पुरवठा होणे शक्य होत नाही. चौकशी दरम्यान ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी नळकनेक्शन घेण्याबाबत कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले आहे परंतु सदयस्थितीत तक्रारदार यांच्या घराच्या परिसरात यापूर्वीचा सार्वजनीक नळ सुरु करण्यात येईल असे मा. सरपंच, नवीन कोळकेवाडी यांनी सांगितले आहे. सार्वजनीक नळ कनेक्शनला सुध्दा कमी दाबाचे पाणी येत असल्यामुळे व तक्रारदार यांना पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी इतर दुसऱ्या मार्गाने प्रयत्न करण्यासाठी ग्रामपंचायत मार्फत प्रयत्न करण्यात येतील तसेच इतर दूसऱ्या मार्गाने नळ कनेक्शन घेण्यासाठी नळ कनेक्शन ज्या जमिनीतून जाणार आहे त्यांची संमत्ती घेण्याबाबत तक्रारदार यांनी वैयक्तीक प्रयत्नासह ग्रामपंचायतीला सहकार्य करण्याबाबत सरपंच यांनी सांगितले आहे.

ग्रामपंचायत मार्फत कोठूनही नळकनेक्शन घेण्याबाबत संबंधित तक्रारदार यांना विरोध करण्यात आलेला नाही. तक्रारदार यांचे राहत्या घराची भौगोलिक रचना सदयस्थितीतील अस्तित्वात